जनसंपर्क कक्ष
7 DEC 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणने अभिनव उपक्रम राबवावेत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षणापासून वंचितांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी दूरशिक्षण केंद्राने नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षकांनी सेवावृत्ती ठेवून दर्जेदार अभ्यासक्रम तयार करून, दूरशिक्षण केंद्राची विद्यार्थीसंख्या वाढवली पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात कार्यरत असलेल्या सहयोगी प्राध्यापक व समन्वयकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन व उद्‌बोधन वर्गात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे. त्यासाठी नवोपक्रम, विविध कार्यशाळा, विविध तंत्रांचे आदान प्रदान गरजेचे आहे. कोल्हापूरच्या दृष्टिकोनातून स्थानिक गरजा ओळखून, कोल्हापूरी चप्पल, गुळ, ऑनलाईन मार्केटिंग, ऑनलाईन डिलीव्हरी बॉय, सेल्समन आदी विषयांवर अभ्यासक्रम तयार करण्याची गरज आहे. विद्यापीठाच्या नॅशनल रिसोर्स सेंटरशी समन्वय साधून सायबर लॉ सारखे कोर्स सुरू केले पाहिजेत. विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी ज्युनिअर कॉलेज, महाविद्यालय तसेच शिक्षणापासून वंचित असलेल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन**

याप्रसंगी बैठक व्यवस्था हॉलचे तसेच महिला कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले.

उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नितिन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. एन. तुरंबेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील, दूरशिक्षण केंद्राचे कर्मचारी व पदाधिकरी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी (दि. ८) क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्यावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर हे 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान' या विषयावर सकाळी नऊ वाजता मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण असतील.

## जी. डी. बापू लाड व्याख्यानमाला

कोल्हापूर : दसरा चौक येथील श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने उद्या, शनिवारी क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. या व्याख्यानमालेमध्ये ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण हे असतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 DEC 2018
तरुण भारत

# शहाजी महाविद्यालयात ८ रोजी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड' व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दसरा चौक येथील शाहू महाविद्यालयातील यशवंत चव्हाण सभागृहात शनिवार ८ रोजी सकाळी ९ वाजता व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के शानेदिवाण असणार आहेत.

मानसिंग बोंद्रे, विजयसिंह बोंद्रे, अरूण लाड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. याप्रसंगी 'क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान' या विषयावर ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करणार आहेत. तरी व्याख्यानाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महामानवाला अभिवादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाणदिनी गुरुवारी जिल्हा प्रशासन, महापालिका, शहरातील सामाजिक, शैक्षणिक संघटना, संस्था यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. बिंदू चौक, महापालिका चौक येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भीमगीतांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

**बिंदू चौकात अभिवादन**

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासमवेत देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, यंत्रमाग महामंडळाचे हिंदुराव शेळके, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख, महापालिका अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर, स्थायी समितीचे अध्यक्ष आशिष ढवळे आदी उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ**

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. जगन कराडे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. एम. टी. गोफणे, श्रीपाल गायकवाड, आनंद खामकर आदी उपस्थित होते. येथील जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना बालकल्याण संकुल येथे संस्थेच्या मानद कार्यवाह पद्मजा तिवले यांच्याहस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रायव्हेट हायस्कूल येथे उपमुख्याध्यापक बी. बी. पाटील यांनी प्रतिमापूजन केले. तर टी. ए. सकट यांनी डॉ. आंबेडकर यांची माहिती दिली.

अर्जुन टाकळकर





**डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डिगे फाउंडेशनतर्फे कँडल मार्च काढून अभिवादन करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात बिंदू चौक येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील.**

## विविध संस्था, संघटनांतर्फे प्रतिमा पूजन, कँडल मार्च

**मिलिंद हायस्कूल**

मुख्याध्यापक एम. एम. शिर्के यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेकडर यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. एस. एस. जिरगे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या स्त्रीविषयक अधिकारांबाबत माहिती दिली.

**दत्ताबाळ हायस्कूल**

शिक्षिका रोहिणी शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना आंबेडकर यांच्याविषयी माहिती दिली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा पल्लवी देसाई, सचिव नीलेश देसाई, मुख्याध्यापक डी. व्ही. पाटील आदींसह शिक्षक उपस्थित होते.

**शिक्षक व सेवक पतसंस्था**

कोल्हापूर जिल्हा बहुजन माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेत संस्थेचे अध्यक्ष रंगराव मांगोलीकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बुद्धवंदना सादर करण्यात आली. रघुनाथ मांडरे यांनी डॉ. आंबेडकर यांचे देशाच्या विकासातील योगदान व्याख्यानातून मांडले.

**लहुजी साळवे प्रतिष्ठान**

अध्यक्ष अक्षय साळवी यांच्या हस्ते बिंदू चौकातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बाळासाहेब साळवी, अमोल कुरणे, मनीषा घुणकीकर यांच्यासह सभासद उपस्थित होते.

**स्टुडंट फेडरेशन**

ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनतर्फे एक घर एक पुस्तक अभियान राबवून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. कॉ. रघुनाथ कांबळे, समाजकल्याण आयुक्त बाळासाहेब कामत यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांना ज्ञानवंदना देण्यात आली.

**डिगे फाउंडेशनतर्फे कँडल मार्च**

दसरा चौक येथील शाहू पुतळा ते बिंदू चौक मार्गावर कँडल मार्च काढून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. माजी आमदार नानासाहेब माने, सदानंद डिगे यांच्या हस्ते आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

**खादी ग्रामोद्योग**

कोल्हापूर जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ व जिल्हा स्वातंत्र्य सैनिक संघटना, जिल्हा सर्वोदय मंडळ व समता हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने खादी संघ येथे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष सुंदरराव देसाई होते. प्राचार्य व्ही. डी. माने, दादासाहेब जगताप, सुजय देसाई, सदाशिव मनुगडे यांच्यासह संघाचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने केंद्र संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, जगन कराडे, के. डी. सोनवणे, निखिल गायकवाड, चेतना सोनकांबळे, एम. टी. गोफणे, श्रीपाल गायकवाड, आनंद खामकर, आदी उपस्थित होते.